INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

December-2019 Special Issue – 210

## साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप








**Guest Editor:**
Dr. Bhausaheb Game,
Principal,
MGV's Arts & Commerce College, Yeola
Dist. Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue:**
Prof. Raghunath Wakle
Dr. Gajanan Bhamare
Prof. Sharad Chavhan

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 210 : साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
December-2019

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **मराठी विभाग** | | |
| 1 | साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप | डॉ. एकनाथ पगार | 05 |
| 2 | साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप | डॉ. धनराज धनगर | 09 |
| 3 | इंटरनेट वरील समृद्ध मराठी साहित्य | डॉ. प्रकाश शेवाळे | 15 |
| 4 | बदलते तंत्रज्ञान व साहित्य व्यवहार | प्रा.योगिता भामरे | 21 |
| 5 | बदलते तंत्रज्ञान व साहित्य व्यवहार | श्री महेश कुलकर्णी | 26 |
| 6 | साहित्य व्यवहाराचे बदलते स्वरूप : ब्लॉग लेखन | प्रा.विनोद भालेराव | 29 |
| 7 | ब्लॉग लेखन | प्रा. संदीप ठाकरे | 32 |
| 8 | साहित्याची बदलती आशयसुत्रे : चित्रपट | डॉ.गजानन भामरे | 34 |
| 9 | मराठी साहित्य व्यवहाराची बदलती प्रसार माध्यमे | प्रा. भारती सोनवणे | 36 |
| 10 | मराठी साहित्याचे बदलते स्वरूप | डॉ. शीला गाढे | 45 |
| 11 | १९९० नंतरचे मराठी कवितेचे बदलते स्वरूप | डॉ. भाऊसाहेब गमे | 47 |
| 12 | वाचन संस्कृतीतील बदलांचा परामर्श | डॉ. हेमराज बिरारीस | 52 |
| 13 | वाचन संस्कृतीतील बदल | प्रा. सुनिल खैरनार, डॉ. उज्ज्वला देवरे | 55 |
| 14 | वाचन संस्कृतीतील बदल | डॉ. स्नेहल मराठे | 58 |
| 15 | वाचन संस्कृतीतील बदल | प्रा.पूनम वाघ | 61 |
| 16 | वाचन संस्कृतीतील बदल | प्रा.ए.जी.नेरकर | 64 |
| 17 | वाचन संस्कृतीतील बदल | प्रा.नंदा बैसाणे | 68 |
| 18 | वाचन संस्कृतीची बदलती माध्यमे | प्रा. विनोद केदारे | 71 |
| 19 | मराठी भाषा आणि विविध क्षेत्रातील संधी | प्रा.मोहन सौंदर्य | 73 |
| 20 | जागतिकीकरणाचा मराठी भाषेवरील प्रभाव | डॉ. अरुण पाटील | 76 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 21 | साहित्य व्यवहार का परीवर्तित स्वरूप | प्रा. कैलास बच्छाव | 78 |
| 22 | हिंदी नाटक साहित्य का परिवर्तित स्वरूप वक्ता-श्रोता के संदर्भ में | डॉ. व्ही.डी.सूर्यवंशी | 80 |
| 23 | जनसंचार माध्यमों में हिंदी भाषा की परिवर्तित स्थिति | सोनू शेन्डे | 82 |
| 24 | संचार माध्यमों मे हिंदी भाषा का परिवर्तित स्वरूप | प्रा.श्रीमती वृषाली वडगे | 85 |
| 25 | हिंदी साहित्य लेखन का परिवर्तित स्वरूप | डॉ.जालिंदर इंगळे, प्रा.संदीप देवरे | 88 |
| 26 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप | डॉ.डी.बी.महाजन, प्रा.आर.एन.वाकळे | 90 |
| 27 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप विकासक्रम में | प्रा.बापू शेळके | 93 |
| 28 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप | प्रा. सविता मुंढे | 98 |
| 29 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप | प्रा. जितेंद्र थोरात | 100 |
| 30 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप | गणेश दिवटे | 105 |
| 31 | हिंदी कहानी साहित्य का परिवर्तित स्वरूप | प्रा. सविता तोडमल | 109 |
| 32 | हिंदी काव्य साहित्य का परिवर्तित स्वरूप | डॉ. अनिता नेरे, डॉ. योगिता अपूर्व हिरे | 112 |
| 33 | ग़ज़ल साहित्य का बदलता स्वरूप | डॉ.जालिंदर इंगळे | 115 |
| 34 | सतसई या दोहावली का बदलता स्वरूप | प्रा.राजाराम शेवाळे | 118 |

# वाचन संस्कृतीतील बदल

डॉ. स्नेहल संजय मराठे
सहाय्यक प्राध्यापक (मराठी विभाग)
म.स.गा. महाविद्यालय, मालेगांव कॅम्प,
मालेगांव, जि.नाशिक

"दिसामाजी काही तरी ते लिहावे |
प्रसंगी अखंडित वाचित जावे ||

समर्थ रामदासांनी नेमक्या शब्दांत वाचनाचे महत्त्व सांगितले आहे. आजकाल माहिती तंत्रज्ञानाच्या काळात मराठी भाषा आणि साहित्य यांत बदल होत आहे. जागतिकीकरणामुळे मराठी भाषकांना माहिती-तंत्रज्ञान स्वीकारणे गरजेचे झाले आहे. प्रामुख्याने 'संगणक' हा या २१ व्या शतकातील सर्वांच्याच प्रगतीचा मार्ग आहे. जागतिक आंतरजालासारखी माध्यमे, माहिती तंत्रज्ञानातील क्रांती आणि संपर्क साधनांची सुलभता यामुळे माहिती किंवा ज्ञान मिळविणे तुलनेने सोपे झाले आहे. या सर्वांचा परिणाम वाचन कमी होण्यास होत आहे. वाचन हा एक संस्कृतीचा भाग आहे. म्हणूनच वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी सर्वांनी पुढे येणे ही बाब आज अतिशय निकडीची झाली आहे.

एका बाजूने वाचन कमी होत चालले आहे असे जरी म्हटले तरी दुसरी बाजू अशी की, मराठीत मोठया संख्येने पुस्तके प्रकाशित होत आहेत. त्यांची विक्रीही होत आहे. आजच्या युवा पिढीला वाचनसंस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आणणे हे एक मोठे आव्हान आहे. कारण इंटरनेट, सोशल नेटवर्किंग आणि संगणक यात ही पिढी रमली आहे. या नव्या माध्यमांमधून मोटया प्रमाणात माहितीचे आदानप्रदान होत आहे. माहितीचा जणुकाही स्फोट झाला आहे. कोणतीही माहिती हवी असल्यास इंटरनेट उघडून, गुगलवर जाऊन माहिती मिळविली जाते. देशाचा आधारस्तंभ असलेल्या तरुणाला केवळ 'माहिती संपन्न' असून चालणार नाही तर 'ज्ञानसंपन्न' बनावे लागेल. यासाठी अर्थात वाचनाला दुसरा कोणताही पर्याय नाही. अवांतर वाचनाला प्राधान्य देणे आवश्यक झाले आहे. नाही तर नवी पिढी प्रगल्भ, चतुरस्त्र होण्याऐवजी केवळ पुस्तकी आणि घोकंपट्टी करणारी होऊ शकते. सुशिक्षित, सुसंस्कृत समाजासाठी वाचनसंस्कृतीची जोपासना करणे गरजेचे आहे. स्वतःला अद्ययावत ठेवण्यासाठी, स्पर्धेत टिकून राहण्यासाठी माहिती हे फार प्रभावी अस्त्र आहे. वैचारिक प्रगल्भतेसाठी वाचनासारखा दुसरा पर्याय नाही. इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांचं जाळं इतकं मोठं आहे की, स्वतः ग्रंथ विकत घेऊन वाचण्याची सामाजिक सवय आपल्यातील बऱ्याच जणांना लागली नाही. ग्रंथालयात बसून लोक वाचत असतात. फिरत्या वाचनालयातून पुस्तक आणून वाचतात. त्यामुळे लोक वाचन नाहीत असे विधान पुरेसे योग्य ठरत नाही.

भारतात श्रवण परंपरेतून, कथा-कीर्तनातून, हस्तलिखितांच्या प्रतींमधून साहित्य प्रस्तृत होत होते. साधारणतः दोनशे वर्षांपूर्वी साहित्य छापील पुस्तक रुपाने आले. परंतु साहित्याला जनमाध्यमाचे स्वरुप आले ते छपाई सुरु झाल्यानंतर. लेखन-मुद्रण-वाचन ही माणसाला लाभलेली अपूर्व देणगी आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणूस सक्षम बनला. एकोणिसाव्या-विसाव्या शतकात भारतात विशेषतः महाराष्ट्रात जी वैचारिक क्रांती झाली त्याचा आधार मुद्रित शब्द हाच होता. त्यामुळे समाजाला प्रेरणा मिळत गेली. स्वातंत्र्यानंतर शिक्षण सर्वत्र पसरले. वाचनाचे महत्त्व महात्मा फुल्यांपासून सर्वांनी सांगितले आहे. व्यक्तिमत्व घडवणारे व समृद्ध करणारे वाचनासारखे दुसरे साधन नाही. वाचनाने कल्पनाशक्ती जागवली जाते. वाचन हा व्यक्तीने घ्यायचा अनुभव आहे असे वाचनाचे फायदे सांगत वाचन चळवळ सुरु झाली. संवेदनशीलता, निर्मितीक्षमता, जाणीवजागृती, भावनाविष्कार, विचारप्रक्षोभ अशा मनाच्या विविध आघाडयांवर

ISSN : 2348-7143
December-2019

वाचनाचा संस्कार असतो. कोणत्याही समाजात पाच-दहा टक्के असे लोक असतात की ते वाचनसंस्कृतीचे संगोपन करतात.

जग विलक्षण झपाट्याने बदलते आहे. त्या बदलत्या वातावरणाची दखल मुख्यतः वृत्तपत्रे, नियतकालिके, टीव्ही न्यूज चॅनल्स आणि आता अर्थातच इंटरनेट यांच्या वाचनाशिवाय आपल्याला 'अप-टू-डेट' राहताच येणार नाही. भारताइतक्या बोली, भाषा, लिप्या आणि अस्मिता जगात कुठेच नाहीत. म्हणूनच भारताचे एकत्व आपल्या वैविध्यातून व्यक्त होते. या सर्व बोली, भाषा व लिप्यांद्वारे जगभरचे सगळे लोक सतत बोलत असतात. ज्यावेळेस ते बोलत नसतात, तेव्हा ते टीव्हीचे कार्यक्रम पाहत-ऐकत असतात. एसएमएस किंवा ट्विटरद्वारे 'कनेक्टेड' असतात किंवा वर्तमानपत्रे, नियतकालिके, पुस्तके, वाचत असतात. शब्दांचा इतका महास्फोट यापूर्वी कधीही झालेला नव्हता. हे सर्व सुमारे तीन हजारच्या आसपास भाषांमध्ये अखंड चालू असते. वाचन संस्कृतीमध्ये दखल घेण्यायोग्य असा हा बदल आहे.

सध्याच्या गतिमान युगात, आजचा युवक 'आऊटडेटेड' होण्याचा धोका टाळण्यासाठी त्याच्या मागच्या पिढीतील तरुणांपेक्षा अधिक वाचत असतो. तो अधिक जागरुक राहण्याचा प्रयत्न करीत असतो. स्वतःला अद्ययावत ठेवणे हे त्याच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक आहे. त्याच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक आकांक्षा अधिक विस्तारलेल्या असल्याने चौफेर वाचन हा त्याचा जगण्याचा श्वास आहे. बातम्या व राजकारणाकडे तरुणींपेक्षा तरुणांना अधिक ओढ असते. तर फॅशन, धार्मिक बाबी व अध्यात्माकडे तरुणींचा अधिक कल असतो. वाचनासाठी वृत्तपत्रे तसेच इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांचा वापर केला जातो. अवांतर वाचनासाठी हिंदी, मराठी, बंगाली भाषेतील पुस्तकांचे वाचन आजचा युवक करतो. ललित साहित्यात फॅण्टसी, कॉमिक्स व अभिजात याप्रमाणे पसंतीक्रम असतो. ललितेतर साहित्यात धार्मिक वाङ्मयाचा युवकांवर अधिक प्रभाव आहे. वाचनातून आनंद मिळविण्यासाठी, मनावरचा ताण हलका करण्यासाठी वाचन केले जाते. परंतु वाचनाची आवड नसणे, वाचनासाठी वेळ न मिळणे, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांचा वाढता प्रभाव तसेच पुस्तकांच्या न परवडणाऱ्या किमती यासारख्या कारणांमुळे आजचा युवावर्ग वाचनापासून दुरावत चालला आहे, असे दिसते. त्यासाठी विद्यार्थी दशेत वाचनवृत्ती वाढविण्यासाठी शाळांमध्ये सक्तीचे अवांतर वाचन, ग्रंथालयाची उपलब्धता यासारखे प्रोत्साहनात्मक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**महाजालावरील मराठीचे वाचन :**

गेल्या काही वर्षांपासून मराठी वृत्तपत्रे इंटरनेटवर वाचली जातात. आपले हजारो मराठी भाषक तरुण व त्यांचे कुटुंबीय नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने जगभर विविध देशांमध्ये स्थायिक झाले आहेत. अशांना तर मराठी वृत्तपत्रांची संकेतस्थळे हे मोठे अप्रुपच वाटत असते. युनिकोडच्या मदतीने मराठी वेब प्रकाशनाचे विश्व अतिशय वेगाने बहरु लागले. अधिकाधिक वाचक आणि लेखक आता वेब माध्यमाच्या मांडवात येऊ लागले आहेत. मराठीत अनेक ईबुक्स आलेली आहेत. अनेक व्यक्ती व संस्था मराठी पुस्तके डिजिटाइज करुन ती संकेतस्थळांवर या सीडींवर उपलब्ध करुन देत आहेत. आजचा तरुणवर्ग या संकेतस्थळांवर जाऊन पुस्तकांचे वाचन करतो. ब्लॉग हा प्रकारही वेब माध्यमाची देणगी आहे. आज शेकडो मराठी ब्लॉग्ज तयार झाले आहेत. त्यातील अनेक कविता, विनोद किंवा काही निवेदकांचे वाचन आधुनिक पिढीकडून होत असते. अनेक ब्लॉग्ज हे अतिशय दर्जेदार साहित्यही देत असते. येत्या काही काळात मराठी विश्वकोशाचे सारे खंड वेबवर प्रकाशित होतील. त्यातला शब्द न शब्द संदर्भ म्हणून शोधता येईल. भविष्यात विद्यार्थ्यांना एका क्लिकवर माहितीचा मोठा खजिना उपलब्ध होणार आहे मराठीचे वेब विश्वातले वाढत चाललेले प्रस्थ भूषणावह आहे.

मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीसंबंधी विपुल माहिती इंटरनेटवर उपलब्ध आहे. मराठीतील संत तुकाराम, रामदास, वि.स.खांडेकर, ग.दि.माडगूळकर, पु.ल.देशपांडे या साहित्यिकांच्या जीवन व साहित्याची संपूर्ण माहिती देणारी प्रत्येकाची स्वतंत्र संकेतस्थळ आहेत. 'यूटयुब' च्या माध्यमातून देश विदेशातील साहित्याचे वाचन करु शकतो. अलीकडे

ISSN : 2348-7143
December-20

मराठीतील प्रख्यात ग्रंथ, दिवाळी अंक, चरित्रे. इंटरनेटवर वाचली जातात. इतकेच काय मराठी कविता, गाणी ऐकताही येतात. इंटरनेटवर बोलकी पुस्तके (टॉकिंग बुक्स) उपलब्ध आहेत. www.marathipustak.org, www.bookganga.com, www.netbhet.com, www.m४marathi.in अशा संकेतस्थळांना भेटी दिल्या की सारं ग्रंथभांडार उभं राहात. मराठीची अनेक संकेतस्थळं आहेत.

विकिपिडिया (en.wikipedia.org)- भाषा,

ई-पेपर गॅलरी (www.epapergallery.com)- वृत्तपत्रे

मायबोली (www.maayboli.com)- साहित्य

फ्रेंड्स लायब्ररी (www.friendslibrary.com)- मासिके

विकिपिडिया (en.wikipedia.org)- साहित्यिक

अशा अनेक संकेतस्थळांवर जाऊन वाचन केले जाते.

सोशल मीडियाचा वापर खुप मोठया प्रमाणावर वाढला आहे. इथे लेखन करणाऱ्या लोकांपेक्षा वाचक जास्त हुशार आहेत, चाणाक्ष आहेत. मला काय वाचायचे आहे आणि मला ते कोण देऊ शकेल, मग त्याच अकौंटवर मी जाईन असा वाचकांचा कटाक्ष असतो. थोडक्यात वाचकाला इथे चॉईस आहे आणि तो लेखकांपेक्षा जास्त आहे. लोकांच्या प्रतिक्रियादेखील वाचनीय असतात. ते देखील एक निरंतर वाचन आहे. सोशल मीडियामुळे थोडेफार का होईना लोकांचे वाचन वाढले आहे हे मान्य करायला हवे. स्मार्टफोनचा वापर वाढल्याने अगदी खेडयापाडयांत आपल्याला वाचले जाते याची जाणीव सोशल मीडियावर वावरणाऱ्या लोकांना आहे.

**समारोप**

एकूणच बदलत चाललेल्या तंत्रज्ञानाच्या युगात लेखन-वाचन मराठीत कमी झालेले नाही. केवळ त्याचे माध्यम बदललेले आहे. बोरु, पेन ते कीबोर्ड पर्यंत मराठी माणसाचा वावर झाला आहे. त्यामुळे होणारे बदल अपरिहार्यतेने स्वीकारले पाहिजेत. तरुण पिढी मराठी पुस्तके वाचत नाही, मराठीला भवितव्य नाही, अशी भीती व्यक्त केली जाते. परंतु तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे लेखन वाचनाच्या माध्यमात वाढत होत आहे. या नवीन माध्यमांमुळे इंटरनेट, वेबसाईट्स, ब्लॉगज, मोबाईल, लॅपटॉपच्या माध्यमातून संदेशांचे- विचारांची देवाणघेवाण होत आहे व वाचनसंस्कृती जोपासली जात आहे

**संदर्भसूची :**

१) व्यावहारिक व व्यावसायिक लेखन प्रणाली- डॉ.मधुकर मोकाशी
२) व्यावहारिक व उपयोजित मराठी- प्रा.डॉ.यं.वि.जोशी
३) मराठी भाषा, संचित आणि नव्या दिशा- सं.पा. विजय कुवळेकर
४) 'लोकराज्य'-अंक ११- फेब्रुवारी २०१४